विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र. २३/एसडी-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ एप्रिल, २०२३

संदर्भ :

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२४११/(८०/११)/अर्थसंकल्प, दिनांक २३/९/२०११
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शैगुवि-२०१५/(८०/१५)/एसडी-६, दिनांक २२/६/२०१५
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शैसापू-२०१५/प्र.क्र.२७५/एसडी-१ दिनांक ७/१/२०१६
४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखसं-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक १/१२/२०१६
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३ दिनांक ४/४/२०२२ व अ.शा.पत्र दिनांक ५/४/२०२२
६) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिसं/२०२२-२३/विज्ञान केंद्र/अंदाज/२०१/८३८ दिनांक ३१/१/२०२३
७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२३/एसडी-१, दिनांक ०९/०२/२०२३
८) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.अनुवि-४९२२/(३३/२२)/अर्थसंकल्प दिनांक १०/०२/२०२३
९) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिसं/२०१/नाविकें/२०२३-२४/३०२८ दिनांक ११/४/२०२३
१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३ दिनांक १२/०४/२०२३

प्रस्तावना:

संदर्भाधीन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ अन्वये राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र पुरवठा व उभारणी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक ११/४/२०२३ च्या पत्रान्वये निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक ११/४/२०२३ च्या पत्रान्वये प्रस्ताविल्यानूसार राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्र पुरवठा व उभारणी करण्यासाठी रुपये २३,११,९५,८००/- (अक्षरी रुपये तेवीस कोटी अकरा लाख पंच्यान्नव हजार आठशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर बाबीवरील खर्च "मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च, (००) (१०) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे (२२०२H६७९), (कार्यक्रम) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षांतर्गत सन २०२३-२४ या वर्षात उपलबध करुन दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करण्यात यावा.

३. यासाठी सहसचिव/ उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" आणि अवर सचिव/ कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणुन घोषित करण्यात येत आहे. संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी कोषागारातून आहरीत करुन शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अंमलबजावणीसाठी सुपूर्द करावा. सदरचा निधी हा दिलेल्या उद्देशासाठीच खर्च करण्यात यावा.

४. सदर अनुदान सशर्त अनुदान असून त्याच्या अटी व शर्ती सदर शासन निर्णयाप्रमाणे आहेत. तसेच यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले आहे.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला उपविभाग-३, अनुक्रमांक-४ परिच्छेद क्र.२७ (२) (ब) व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३ दिनांक १२/४/२०२३ अन्वये विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०४२७११४५११५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

IMTIYAZ MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=39a40419de755c2eab61fb555b2fdf8c8d6d652ff18fdffbd9c748ab01f6da04, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77A529748C5E7C1BA7A66E81C654BA3C492FDA5B29E076241DB1BA213DDEDF4E, cn=IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.04.27 14:07:40 +05'30'

(इ. मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
२. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान सभा/परिषद यांचे स्वीय सहाय्यक
३. मा.सदस्य, महाराष्ट्र विधान सभा/परिषद
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहाय्यक

५. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
१०. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, मुंबई
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१३. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे
१४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
१७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व
१८. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व
१९. स्थानिक निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२०. सहसचिव (एसडी/प्रशा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१. उपसचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२. उपसचिव, वित्त/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३. अवर सचिव (अर्थसंकल्प/रोख शाखा/एसडी-१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२४. वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई-३२
२५. निवडनस्ती (एसडी-१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२